वर्ष ४१ अंक ८

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ
|| मराठी तितुका मेळवावा ||

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

ऑगस्ट २०२१

## अध्यक्षीय



नमस्कार मंडळी,

"काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल
नांदतो केवळ पांडुरंग ।
दश इंद्रियांचा एक मेळ केला
ऐसा गोपाळकाला होत असे" ॥

मंडळी, नुकतीच आषाढी एकादशी विठुमाऊलीच्या नाम-गजरात पार पडली. मराठी मातीपासून शेकडो मैल दूर असलो तरी विठूनामाची ती स्पंदनं आपल्या मनापर्यंत पोचतातच आणि मग प्रत्यक्ष काया हीच जणू पंढरी आणि आत्मा हा विठ्ठल होऊन जातो. या मानसभक्तीला यावेळी स्वरांच्या माध्यमातून आविष्कृत केलं, बृहन्महाराष्ट्र मंडळाचा (बृ .म. मंडळ) 'उत्तर अमेरिकेतील कार्यक्रम' या उपक्रमांतर्गत टोरांटो मराठी भाषिक मंडळाच्या कलाकारांनी! या 'आषाढी संगीतोत्सवा'मध्ये टोरांटो येथील नव्या दमाचे तरुण कलाकार सहभागी झाले होते. अतिशय उत्तम प्रतिसादात हा कार्यक्रम पार पडला.

अशा अनेक नवनवीन कल्पक कार्यक्रमांचे आयोजन बृ .म. मंडळ करीत असते. येणाऱ्या २०२२च्या 'अटलांटिक सिटी' मधील अधिवेशनात तर अशा कल्पक आणि मनोरंजक कार्यक्रमांची भरगच्च मेजवानीच आहे. जगभरातील उत्तमोत्तम मराठी कार्यक्रम इथल्या रसिकांपर्यंत पोहोचावे, यासाठी कार्यक्रमांचे प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन आम्ही करीत आहोत. प्रस्ताव पाठवण्यासाठी वेबलिंक आहे http://bmm2022.org/submit-program-proposal/. प्रस्ताव स्वीकारण्याची शेवटची तारीख आहे: १५ ऑगस्ट २०२१. मंडळी, आपल्या अधिवेशनाच्या कामाची प्रगती तुम्हाला सांगायची, म्हणजे व्हीआयपी आणि व्हीव्हीआयपी पॅकेजेस विकली गेली आहेत. आता ब्राँझ आणि सिल्वर पॅकेजेस आहेत. ती खरेदी करण्यासाठी त्वरा करा. सेलिब्रिटी शेफ विष्णू मनोहारांचे खास बेत आणि अनेक उत्तमोत्तम कार्यक्रम तुमच्यासाठी सज्ज आहेत. बाकी आपले कराओके, मानसिक स्वास्थ्यावरील व्याख्याने, उत्तररंग, मराठी शाळा, लेखक तुमच्या भेटीला हे उपक्रम नेहमीप्रमाणेच उत्साहात आणि उत्तम प्रतिसादात सुरू आहेत. बृ. म. मंडळाची 'दीपस्तंभ' ही हेल्पलाईन गरजूंपर्यंत पोहोचते आहे. त्याचप्रमाणे 'BMM Globalization' आणि 'Proud to be BMM member' या संकल्पनांवरही जोरात काम सुरू आहे.

'उत्तर अमेरिकेतील कार्यक्रम' या उपक्रमांतर्गत ऑगस्ट महिन्यात आपण पहाणार आहोत एक खुसखुशीत नाटक 'येणाराय येणाराय'. आपल्या महाराष्ट्राची नव्यानं ओळख करून देणारं हे नाटक! सत्तरहून अधिक कलाकार घेऊन शिकागोतल्या मंडळींनी हा खास प्रयोग 'BMM' साठी उभा केलाय. सुमारे पंचवीस वर्षांनी भारतात जात असलेल्या शिकागोच्या नायकाला भारतात कुठल्या दिव्यातून जावं लागतं, त्याची रंजक कहाणी आपल्याला बघायला मिळेल.

मंडळी,आपल्या कर्मभूमीत आपण मनापासून रुजलो आहोत. तरीही मायदेशी जाणारं एखादं पाखरू जरी दिसलं तरी,
"देते तुझ्या सोबतीला आतुरले माझे मन
वाट दाखवाया नीट, माझी वेडी आठवण"... अशी मनाची अवस्था होऊन जाते. ४ जुलै'चा अमेरिकेचा स्वातंत्र्योत्सव साजरा करतानाच १५ ऑगस्टचा भारतीय स्वातंत्र्यसोहोळा बघण्यासाठीही मन आतुरलेले असते. स्वातंत्र्य या मूल्याचा आदर करणारा जगातील प्रत्येक स्वतंत्रता दिवस चिरायू होवो हीच शुभेच्छा!

कळावे लोभ असावा!

आपली नम्र,

- **विद्या जोशी** (अध्यक्षा, बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका)
Vidya.Joshi@bmmonline.org

***

## या अंकात...

पान क्र.

- BMM Marathi Shala Registration Now Open २
- Atlantic City (NJ) Convention Center: A Green Venue for BMM Convention ३
- वैदेही डोंगरे -'मिस् इंडिया - यु. एस. ए.' ४
- लेखक तुमच्या भेटीला
- लेख:- पालथ्या घड्यावर पाणी' ५
- लेख: अमेरिकेतील शाळेतल्या अभ्यासाचे दडपण ६
- लेख:- कितीदा नव्याने ७
- लेख:- दोन किनारे जुळविताना ८
- लेख:- उत्तररंग ९
- कविता:- चक्रव्यूह १०
- कविता:- 'जेथे असते निर्भय मन'...
- पुरवणी ई विभाग:- कविता:- 'देव', For Kids: Triangle Game
- BMM YuvaVani - Newsletter
- राशिभविष्य:- ऑगस्ट २०२१
- Matrimonial and Business Advertisements ११-१२

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
**संस्थापक**: कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय -संपर्क:-**
**BMM Treasurer - Sona Bhide**
**3574 S. Marion Way, Chandler, AZ 85286**
Ph- (480) 812-9511 (PST) Email- sona.bhide@bmmonline.org
**वर्गणीचे दर: Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription

**जाहिरातींचे दर**
पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२० तारखेपर्यंत** हाती आलेल्या मजकुरातून **निवडक** मजकूर नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो **युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा.**
**प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही.**
लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.
पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०१९-२०२२)**
**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | विद्या जोशी | शिकागो, इलिनॉय |
| **सचिव** | कोमल चौक्कर | लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष** | सोना भिडे | फिनिक्स, ॲरिझोना |
| **सदस्य:** | मिलिंद बावडेकर | ॲटलांटा, जॉर्जिया |
| | संदीप बेलखोडे | ऑस्टिन, टेक्सास |
| | संदीप दीक्षित | क्लिवलँड ओहायो |
| | शिल्पा कुलकर्णी | बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स् |
| | हेमा राचमाळे | डेट्रॉइट, मिशिगन |

**नियुक्त सदस्य**

**माजी अध्यक्ष:** अविनाश पाध्ये, बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स्

**वृत्त संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**

**अध्यक्ष :** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन

**सदस्य :** नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय

**सदस्य :** सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट

...


**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
**संकेतस्थळ:** https://www.bmmonline.org


Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.



**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:**
vinata@gmail.com or vinatak.bmmvrutta@gmail.com

Address: 3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503



## BMM Marathi Shala
## Registration Now Open!




**Registration now open for Marathi Language Online Courses**

- Five Level Comprehensive Courses for Grade 9 +
- Conversational Courses for Adults

Enrollment starts August 1st, 2021 till September 30th, 2021

Contact Us :
contact.bmmshala@gmail.com

Click Here to Enroll
Or
**Fill out Student interest Form Given below:**

https://docs.google.com/.../1FAIpQLSehFgRyllacAi.../viewform

# Atlantic City (New Jersey) Convention Center-

## A Green Venue for Bruhan Maharashtra Mandal Convention

**August 11-14, 2022,**

**- Darshana Gupte** (San Antonio, Texas)
(BMM 2022 Go-Green Committee Advisor)



Shocked but not Surprised. That's the reaction I suspect many people have had- at least people who take an interest in climate change- to the catastrophic weather events this Summer. From Detroit to Germany to Mumbai, climate change is worsening torrential downpours. Wildfire smoke is wafting from the Pacific Coast all the way to the mid-Atlantic, leading to code orange air quality alerts for Washington D.C., Baltimore, warnings that vulnerable residents should avoid strenuous activity, In New York City, according to USA Today, "the Sun glowed red-orange as haze clouded" the skies. "I think people see it, but I'm not sure they realize how much worse it's going to get and how quickly," Josh DE Florio, head of Climate Resilience for the Port Authority of New York and New Jersey, told CNN. The clock is ticking fast on the Climate Crisis. Mother Nature has made it crystal clear that these record-breaking climate impacts will move from Headlines to Daily News.

So, what creative action can BMM take to make this world better place for future generations? Simple! Let's start with making BMM 2022, a "Green Convention"! To make any convention GREEN is a big undertaking which involves many aspects of human and mechanical efforts. Marathi Vishwa New Jersey, the host for BMM 2022 Convention has accepted this challenge! Selecting Atlantic City Convention Center, BMM team took the first step towards their *Green Theme*. It will help to minimize greenhouse gas emissions, lessen resource consumption, protect the local environment, help the local economy, increase general awareness of sustainability; but most of all, stop tremendous amount of waste that will generate during the BMM event. With sustainability at its core, it will leave a positive legacy for future BMM convention.

Here are some highlights of Sustainable (Green) Efforts at the Atlantic City Convention Center.

1. The Atlantic City Convention Center (ACCC) is committed to preserving its unique seaside environment while providing a clean, safe, healthy atmosphere for the guests. The efforts include measuring and tracking energy performance, developing and implementing an energy savings plan, and communicating the importance of energy savings and waste reduction to facility staff, clients and the community. "Going Green" has consistently been one of the Center's main operating objectives, earning the facility inclusion as a founding member of the Convene Green Alliance.

2. Energy Efficiency: Energy conservation is a major challenge for many convention centers as the buildings are often operating on a near 24-hour basis.

* In 2019, ACCC has been awarded Leadership in Energy and Environmental Design (LEED) GOLD certification by Spectra, the provider of Venue Management and Food Services & Hospitality to the ACCC.

* On average, over 3 million KiloWatt hour (KWh) of electricity is produced each year from the venue's rooftop solar panels. This is the Equivalent to powering 250 homes for one year! Total solar generation equates to roughly 20% of the building's total energy for an average year.

* Reduction of lighting loads by nearly 63% by retrofitting the facility with new LEDs. The ACCC anticipates savings of nearly $4.4 million in electricity costs since its debut through 2029.

* Efficient operation of lighting and heating, ventilation, and air conditioning (HVAC) systems to minimize their use during non-peak times.

Reduction of water usage by 20% with installation of new low flush valves in the venue's 32 restrooms.

Recycling: They have invested in large see through cages on wheels, labeled appropriately as "cardboard," "vinyl," "clear plastic" or "Styrofoam,"

which make it convenient for all to recognize the correct placement for their waste.

So far, over 150 tons of recycled materials diverted from landfills in an average year. 9,583 lbs. of lamps, ballasts, batteries, and electronics were recycled per year.

Food Service: Green seal approved chemicals, energy star equipment, local sustainable produce.

BMM team is also working on to reduce their Carbon footprint in the following areas. Addressing plastic pollution, reducing water and food waste, printing material alternative and transportation.

In conclusion, There is only one planet we live on and we need to preserve it for our future generations to come.

***

## वैदेही डोंगरे- 'मिस् इंडिया - यु. एस. ए.'

**- ज्योत्स्ना दिवाडकर** ( डेट्रॉईट, मिशिगन)

शुक्रवार १६ जुलै २०२१च्या रात्री (ट्रॉय, मिशिगन) येथील वैदेही डोंगरेचे - कधीही न पाहिलेले - स्वप्न पुरे झाले आणि तिला 'मिस् इंडिया - यु. एस. ए.' हा किताब मिळाला.

१९८०मध्ये वर्ल्डवाईड पॅजन्ट या संस्थेतर्फे न्यूयॉर्कमध्ये या सौन्दर्यस्पर्धेची सुरुवात झाली. परंतु हा मान मिळवणारी गेल्या चाळीस वर्षातील ही पहिलीच मराठी मुलगी आहे. वैदेहीने पाच वर्षे वयाची असताना २००१ साली डेट्रॉईट येथे 'मिनी मिस मिशिगन' हा किताब मिळविला होता.




अत्यंत मनमिळाऊ आणि शुद्ध मराठी बोलणाऱ्या वैदेहीने 'युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगन' मधून इंटरनॅशनल स्टडीज या विषयात (Major) व रॉस बिझिनेस स्कूल'मधून बिझिनेस मॅनेजमेंटमध्ये (Minor) पदवी मिळवली.

ती सध्या न्यूझीलंड सरकारकरिता त्यांच्या अमेरिकेतील ट्रेड कमिशन विभागात बिझिनेस डेव्हलपमेंट ॲनलिस्ट म्हणून काम करते. "AWE Foundation" ( Achieving Women Enterprise) या सेवादायी संस्थेतही ती विनामूल्य काम करत आहे. 'अबला नव्हे या सबला' हे तत्त्व डोळ्यांसमोर ठेवून स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी ही संस्था कार्यरत आहे. 'मिस मिशिगन' म्हणून निवडून आली तेव्हाच वैदेहीने ठरवले, की स्पर्धेच्या मंचाद्वारे या संस्थेच्या कार्याची सर्वांना माहिती करून द्यायची!

कथक नृत्य, गायन आणि व्हायोलिन वादन या तिन्ही कलांत वैदेही पारंगत आहे. IFC (Indian Festival Committee) तर्फे भरवलेल्या या सौन्दर्यस्पर्धेत शेवटच्या टप्प्यात 'घर मोरे परदेसिया' या गाण्यावर तिने केलेल्या कथक नृत्याने सर्व प्रेक्षकांना जिंकले आणि "मिस टॅलेंटेड"चेही पारितोषिक तिने मिळवले. आई सौ. मनीषा डोंगरे तिची कथक गुरू आहे आणि तिची आत्या शुचिता आठलेकर यांच्याकडे तिचे संगीत शिक्षण चालू आहे. व्यायाम व शरीर-संवर्धनासाठी तिला कोणत्याही बाहेरच्या ट्रेनरची गरज भासली नाही. धाकटा भाऊ, विनीत, याचे तिला मार्गदर्शन मिळाले. अमेरिकेत राहून भारतीय संस्कृती जपण्याचा तिचे वडील सतीश डोंगरे यांचा अट्टाहास ती पूर्ण करत आली आहे. वेळ मिळेल तेंव्हा तिला वेगवेगळ्या देशात जाऊन निसर्गाच्या सान्निध्यात हिंडायला आवडते. ३० वर्षाच्या आत ३० देश फिरण्याचे वैदेहीचे स्वप्न आहे. आत्तापर्यंत अनेक देश आणि अनेक पारितोषिके मिळवूनदेखील वैदेहीचे पाय जमिनीवर भक्कमपणे टेकलेले आहेत.

येत्या सप्टेंबर महिन्यात मुंबईमध्ये भरणाऱ्या पॅजन्टमध्ये ती 'मिस इंडिया - वर्ल्डवाईड' स्पर्धेत अमेरिकेचं प्रतिनिधित्व करेल.

पुढील वाटचालीसाठी वैदेहीला मन:पूर्वक शुभेच्छा!

***

## 'लेखक तुमच्या भेटीला'

**Live on BMM Facebook & YouTube**

**भाग ११:-** शनिवार जुलै १७, २०२१ सकाळी ११-११:३० CST
**लेखिका:- मोहना जोगळेकर** (शार्लट, नॉर्थ कॅरोलायना)
**संवादक:- विनता कुलकर्णी** (शिकागो) **यूट्युब लिंक:** https://www.youtube.com/watch?v=LaRojaiLcMs&t=584s

**भाग १२:** शनिवार,ऑगस्ट २८, २०२१ सकाळी ११-११:३० CST
**लेखक:- डॅन मयूर** (शुगरलँड, टेक्सस)
**संवादक:- कोमल चौक्कर** (लॉस अँजलीस)
**वेबलिंक** बृ. म. मंडळाच्या फेसबुक पानावर, **यूट्युब लिंक: -**https://www.youtube.com/channel/UCZfn97uT8atsC9-CLAwJeRQ

# पालथ्या घड्यावर पाणी !

- **सुधीर शं कुलकर्णी** ( लेथम, न्यू यॉर्क)



काही महिन्यांपूर्वी एका मित्राला फोन केला. बऱ्याच महिन्यांपासून सर्वत्र कोविड परिस्थितीमुळे प्रत्यक्ष भेटता आले नाही, म्हणून मी फोनवर त्याची व त्याच्या कुटुंबाची चौकशी करत होतो. त्यानेही माझ्या कुटुंबाची विचारपूस करून मला प्रश्न केला, "सध्या भारतात काय चालले आहे?"

त्याच्या ह्या विचारण्याचं मला नवल वाटले, कारण राजकारण, मग ते भारतातील असो किंवा अमेरिकेतील असो, त्याचे मत मला माहीत होते. "सर्व राजकारणी बदमाश असतात" अशी त्याची ठाम समजूत होती. त्यामुळे राजकारण सोडून बाकीच्या विषयांवर आम्ही बोलत असू. माझी व या मित्राची पूर्वी भारतात असताना आम्हा दोघांचे कार्यालय एक असल्याने तेथे ओळख झाली. नंतर मी अमेरिकेत आल्यानंतर काही वर्षांनी तो इथे आला. तेव्हापासून आम्ही एकमेकांशी संपर्क ठेऊन आहोत. अमेरिकेत स्थिरस्थावर झाल्यावर मी व माझे कुटुंब अधून-मधून आईवडिलांना भेटण्यासाठी भारताला भेट देत असू. त्यांच्या निधनानंतर आम्हा दोघांच्या भावाबहिणींना भेटण्यासाठी आम्ही भारताच्या वाऱ्या करत होतो. मात्र माझ्या ह्या मित्राने त्याच्या आईवडिलांच्या निधनानंतर आपल्या भावाबहिणींशी फारसे संबंध ठेवले नव्हते. त्याला भारतातील घडामोडीत स्वारस्य उरले नव्हते.

भारतात असताना त्याला शाळेत खो-खो व कॉलेजमध्ये क्रिकेट खेळण्याची आवड होती. मात्र अमेरिकेत ते खेळ खेळले जात नव्हते आणि वाढत्या वयाचा विचार करून, इथल्या खेळात त्याची भूमिका प्रेक्षकाचीच झाली होती. त्यासाठी इथे उन्हाळ्यात बेसबॉल , नंतर अमेरिकन फुटबॉल, तर हिवाळ्यात बास्केटबॉल व आईस- हॉकी असे प्रत्येक सीझनमधील खेळ नियमित बघणे हा त्याचा आवडता छंद झाला. त्याला राजकारणांत फारसा रस नव्हता. बहुधा त्याला भारतात काही वेगळ्या घडामोडी चालल्या आहेत अशी कुणकुण लागली होती. म्हणून त्याबद्दल त्याला माझ्याकडून जास्त माहिती हवी असावी असा मी अंदाज बांधला. मात्र त्याने विचारल्यामुळेच मी त्याबद्दल सांगायला सुरुवात केली.

"भारतात दिल्लीभोवतीच्या महामार्गांवर २६ नोव्हेंबर, २०२० पासून शेतकऱ्यांनी रस्ते अडवून आंदोलनाला सुरुवात केली होती. केंद्रीय सरकारने कृषी सुधारणेसाठी तीन कायदे संसदेत मंजूर करून घेतले व त्याची अंमलबजावणी सुरू केली. पंजाब व हरयाणा ह्या प्रांतातील शेतकऱ्यांचा ह्या तीन कायद्यांना विरोध आहे. हे कायदे रद्द केल्या खेरीज ते आपले आंदोलन मागे घेणार नाहीत. सरकार व शेतकरी पुढारी ह्यांच्यात त्यासंबंधी दहा वेळा चर्चाही झाली. प्रकरण सुप्रीम कोर्टामधेही गेले. त्यांनी दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकण्यासाठी एक समिती नेमली. पण शेतकरी पुढारी संसद व सुप्रीम कोर्टाला न जुमानता, आपली अडेलतट्टू भूमिका सोडायला तयार नव्हते. मात्र २६ जानेवारीला ह्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. ह्या आंदोलनात घुसलेल्या खलिस्तानी व वाम-पंथीयांनी, मिरवणुकीतील ट्रॅक्टरांचा वापर करून लाल किल्ल्यात घुसून तोडफोड केली. तिथे संरक्षणासाठी असलेल्या पोलिसांना खाली खंदकात ढकलून त्यांच्यावर अत्याचार केले. आणि सर्वात कहर म्हणजे किल्ल्यावरील तिरंगा हटवून शीख धर्माचा झेंडा लावला. प्रजासत्ताक दिनानिमित्त झालेल्या अराजकतेची चौकशी चालू आहे. मात्र हा सर्व प्रकार एका आंतर्राष्ट्रीय कटाचा भाग होता, हे नंतर उघडकीस आले. त्यात अमेरिकन गायिका- रिहाना, युरोपमधील पर्यावरणवादी -ग्रेटा थुनबर्ग, हॉलिवूडची एक नटी- मीया खलिफा ह्यांचा समावेश होता. आणि त्याविरुद्ध भारतरत्न सचिन तेंडुलकर, लता मंगेशकर व इतर कलाकारांनी परदेशीयांनी भारताच्या आंतरिक मामल्यामध्ये लक्ष घालू नये, असे बजावले. आणि सर्वात कळस म्हणजे ह्या सच्च्या भारतीयांविरुद्ध तीन चाकी रिक्षावाले (तीन पक्षांचे) महाराष्ट्र सरकार चौकशी करणार आहे! ह्यापुढे देशाची आणखी फाळणी होऊ नये, असे माझ्यासारख्या बऱ्याच अनिवासी भारतीयांचे मत आहे. त्या कारणाने आपल्या मातृभूमीला पाठिंबा देण्यासाठी वृत्तपत्रांतून किंवा सोशल मीडियामधून मोहीम चालवणे जरूरीचे आहे' असे माझे विचार मी मित्राला सांगितले.

माझे बोलणे ऐकून मित्र म्हणाला, "चर्चिलचा मी चाहता नाही, पण स्वातंत्र्यापूर्वी त्याने लिहिले होते -भारतीयांना स्वातंत्र्य दिले तर ते आपसांत भांडतील. आणि आता तेच घडत आहे. त्यामुळे भारताविषयी मी निराशावादी का आहे हे तुझ्या लक्षात येईल!" भारताला पाठिंबा देण्याच्या मोहिमेबद्दल तो काहीच बोलला नाही ह्याचे मला आश्चर्य वाटले नाही, कारण आपल्या मातृभूमीसंबंधीचे त्याचे विचार मला ठाऊक होते, त्यामुळे विषयांतर करून थोड्या वेळाने मी फोन ठेऊन दिला.

मग मी विचार केला, की मला जे माझ्या मातृभूमीबद्दल वाटते तसेच इतरांनाही वाटेल अशी अपेक्षा मी का करावी? मला अजून भारताबद्दल आपुलकी आहे, मला तिथे भेट द्यायला आवडते. गेली ५४ वर्षापेक्षा जास्त वर्षे अमेरिकेत राहिलो असलो तरी माझ्यातील भारतीयत्व अजून गेलेले नाही! मात्र माझ्या ह्या मित्राप्रमाणे अजून काही परदेशी स्थायिक, पण मूळचे भारतीय असलेल्यांमध्ये आपल्या मातृभूमीबद्द ल फारच थोडी आस्था बघायला मिळते. त्यांच्या मते, 'हा देश आता आपली कर्मभूमी व आपल्या भावी पिढीच्या दृष्टीने जन्मभूमी आहे. तेव्हा आता परदेशी स्थायिक पहिल्या पिढीने आपल्या मातृभूमीची नाळ कापली पाहिजे. तसेच आपल्या सर्वांचे भविष्यही इथेच आहे हे लक्षात ठेवले पाहिजे!' परंतु माझ्यामते, ज्यांचे बालपण भारतात गेले, तिथल्या करदात्यांच्या कृपेने मिळालेल्या शिक्षणाच्या जोरावर ते परदेशी येऊ शकले, हे त्यांनी विसरता काम नये! भारतमातेचे पांग कसे फेडता येतील, ह्याचा त्यांनी विचार करायला नको का? निदान मातृभूमीशी आपले सोयर-सुतक नाही ही त्यांची भावनाही बरोबर नाही, अजून त्यांचे कित्येक नातेवाईक भारतात राहत आहेत हे ते विसरतात कसे? परंतु, नंतर माझ्या लक्षात आले, की अशा स्वभावाच्या व्यक्तींकडून आपल्या मातृभूमीबद्दल काही अपेक्षा ठेवणे म्हणजे 'पालथ्या घड्यावर पाणी' !

***

# अमेरिकेतील शाळेतल्या अभ्यासाचे दडपण!

**- अस्मिता मोडक** (शार्लट, नॉर्थ कॅरोलायना)



"अगं, किती वेळ झोपलीयेस, सकाळचे १० वाजून गेले!".

"Oh! Its summer vacation mom, let me sleep!"

हे ऐकल्यावर मला माझ्या भारतातील शाळेच्या सुट्टीचे आणि त्याआधी होणाऱ्या परीक्षेच्या काळातले दिवस आठवतात. २५ वर्षांपूर्वी परीक्षा म्हंटले, की तेव्हा काहींजण बिनधास्त असत, अन् माझ्यासारखे काहीजण जीव मुठीत धरून अभ्यासाच्या मागे लागत असत. शाळेतील धमाल, संध्याकाळी मित्रमैत्रिणींबरोबर फिरायला जाणे आणि उरलेला वेळ आईची सतत आपल्यावर असलेली पाळत आठवून अजूनही हसू येते. त्याकाळी चढाओढ होतीच पण आजूबाजूचा प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने अभ्यास करीत असे. आईने किंवा वडिलांनी अभ्यासात केलेली मदत थोड्या सहजतेने स्वीकारलीही जात असे. पण हे सर्व भारतातल्या त्याकाळच्या परिस्थितीनुसार होते.

भारताबाहेर इतकी वर्षे राहिल्यावर मुलांना वाढवताना तोच भारतीय जुन्या आठवणींचा उजाळा मला हवाहवासा वाटला तरीही अमेरिकेत जन्मलेल्या ह्या मुलांना तो नकोसाच वाटतो. इथे मार्च/एप्रिल पासून जूनपर्यंत परीक्षा आहे याचे दडपण मलाच येत असते, पण मुलं मात्र "परीक्षाच आहे ना, मग त्यात काय?" हे अमेरिकन इंग्लिशमध्ये मला सुनावतात. मी तरीही त्यांच्याकडे कानाडोळा करत त्यांच्या अमेरिकन पुस्तकांमध्ये नाक खुपसते. ऑफिसच्या कामातून वेळ काढून शाळेत काय सुरू आहे, हे समजून घेण्यासाठी माझी मुलांच्या मागे भुणभुण सुरू होते. पण ते सध्या शिकत असलेल्या गोष्टी समजल्यावर पुन्हा ते जुने न्यूटनचे लॉज् आठवायचे, किंवा पॉलिनॉमिअल, मल्टिनॉमिअलच्या जाळ्यात स्वतःला ओढवून घ्यायचे, याचा विचार करूनच मला दरदरून घाम फुटतो. माझा कावराबावरा चेहरा पाहून मुलं, "आई, तुमच्या वेळी आणि आमच्या वेळी ही तुलना कुठे करत बसतेस?", असं विचारतात. तू भारतात शिकलेली मग, आम्ही अमेरिकेत काय शिकतोय हे तुला काय समजणार?" या प्रेमळ वाक्यांनी मुलं मला वेड्यात काढण्याची एकसुद्धा संधी सोडत नाहीत.

मी तरीही ह्या पुस्तकातले नाही तर त्या वेबसाईटवरचे जास्तीत जास्त तुला जमले पाहिजे, म्हणून हट्टाने पेटून उठते. का कोणास ठाऊक पण २५ वर्षांपूर्वीची माझी आई त्यावेळी माझ्या अंगात संचारते. मी भारतातून आणलेली अभ्यासाची पुस्तके मुलं नाखुशीनेच उघडतात पण प्रत्येक पुस्तकात Cody आणि Josh ऐवजी प्रकाश आणि अमित ही नावं बघून वैतागतात. त्यातच लिटर आणि गॅलन असो किंवा रुपये आणि डॉलर असो, पुस्तकातला गोंधळ मुलांच्या डोक्यातही उडतोच. ही चिडचिड जास्ती काळ सहन करण्यापेक्षा एखादी चांगली वेबसाईट मी मुलांना शोधून देते पण टेक्नॉलॉजीमध्ये आपल्या चार पावलं पुढे असलेली मुलं, यापेक्षा ही दुसरी वेबसाईट का आणि किती "त्यांच्या" फायद्याची आहे, हे मला पटवून देतात.

अशावेळी मला माझी स्कॉलरशिप परीक्षेची गाईड्स आठवत असतात, प्रज्ञा- प्राविण्य परीक्षांची तयारी मनातून सरत नसते आणि त्या ओघात मी शेजारचा मुलगा/मुलगी kumon, IXL, AOPS करतो म्हणून माझ्या मुलांना त्यांची उदाहरणे देऊ लागते. तोपर्यंत माझी वैतागलेली मुलं "आता मे महिना सुरू झालाय आणि टीचरनी शाळेत शिकवलेल्या, सांगितलेल्या गोष्टी मला आधी करायला हव्यात." हे सांगून माझे बोलणे पूर्ण बंद करतात. शेवटी मे महिना शाळा संपवण्यात (मुलांचा उरकण्यात) जातो आणि जूनमध्ये परीक्षा झाल्या, की मुलांपेक्षा माझाच परीक्षेचा हँगओव्हर उतरतो. शाळेचा शेवटचा दिवस झाला म्हणून "चला धन्य झाले मी एकदाची!" असे म्हणून मी सुस्कारा सोडते आणि तेव्हा जाऊन साक्षात्कार होतो, की "अरेच्या, आपली मुलं ABCD आहेत. (भारतीय मुलं अमेरिकेत जन्मल्यावर त्यांची सांस्कृतिक पातळीवर होणारी द्विधा मनस्थिती अधोरेखित करण्यासाठी ABCD- American born confused Desi हा शब्द इथे वापरला जातो.) माझ्या भारतीय पद्धतीच्या प्रत्येक गोष्टी त्यांना लागू पडणार नाहीत." पुढच्यावर्षी मुलांना त्यांच्या अभ्यासाबाबतीत समजून घायचे, हे मी तेव्हा ठरवते. नाईलाजाने का होईना सामंजस्य दाखवण्याची ढाल मीच उचलायला हवी हे मी मलाच पटवते. शाळा सुरू झाल्यावर पुन्हा मार्च महिना येईपर्यंत ABCD मुलांना समजून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करत असताना आपल्या मुलांप्रमाणे आपणसुद्धा ABCD तर होऊ लागलो नाही ना, अशी दाट शंका येऊ लागते. आणि मार्च महिना आला, की मात्र मुलांच्या थंड चेहऱ्यासमोर माझ्या भारतीय अभ्यासाच्या शिकवणीचे वारे पुन्हा तसेच वाहू लागतात!

***

## बृहन्महाराष्ट्र वृत्त पुरवणी ऑगस्ट २०२१ ई विभाग - (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)

**कविता:- 'देव'- कांचन गोडबोले** (क्लीव्हलँड, ओहायो)


**For Kids:- Triangle Game – Rajiv Tambe** (Pune)
**वाचण्यासाठी संकेतस्थळ:-**
**https://bmmonline.org/vrutta-supplements/**
**Or Direct Link: Click:- Here**

**- BMM Yuva-Vani:- August 2021 Click:**
**https://bmmonline.org/yuva-vani-archives/**
**Or Direct Link: Click:- Here**

**- राशिभविष्य:- ऑगस्ट २०२१ - दादा दामले** (न्यू जर्सी)
**Click:-https://bmmonline.org/rashi-bhavishya/**

# कितीदा नव्याने!

- **प्राजक्ता पाडगांवकर** (कम्मिंग, जॉर्जिया)



देशांतर अवघडच! ते अनेक पिढ्यांपर्यंत स्वतःचे माग सोडून जाते. मायदेशाप्रती जिव्हाळा, हुरहूर आणि आस अशी सहजी संपत नाही, हे देश सोडून दुसरीकडे राहणाऱ्या प्रत्येकालाच माहीत असते. त्यातून मग सतत कुजत जाणाऱ्या आठवणी, त्यावर नव्या संस्कृतीचं नवं फस्फसणारं खमीर आणि बदलाची तळपणारी धग! निराळेच रोठ तयार होत जातात अस्तित्वाचे! तर असे हे रोठ, नव्याने देशांत रुजणाऱ्या कोवळ्या जीवांना कसले सोसायला! मग म्हणत म्हणत काही अपवाद सोडले तर हे नवे निर्वासित जीव, आपल्या जन्मदात्यांची संस्कृती, रीतीरिवाज आणि बोलचाल, सगळे सगळे सोयीस्कर दूर ठेऊ लागतात, किंवा विसरून जातात. कदाचित तसे करणेच अधिक सोयीचे असेल, कोण जाणो!

मात्र पालक म्हणून जी पिढी देशांतर करते, त्यांच्यावर कायम अनेक नाती निभावण्याचा भार असतोच, मुलांसाठी एक संपूर्ण कुटुंब तयार करण्याचा भार! स्वतःची संस्कृती पुढल्या पिढीपर्यंत सुपूर्द करण्याचा भार! मात्र ह्याच पेचात अडकलेल्या मला काही निराळेच वाटू लागले आहे. जरा निरीक्षण केले तर लक्षात येईल, की हे स्मृतिरंजनाचे रोठ जर बाजूला ठेवले तर आपल्यातले अनेकजण मनाने अजून भारतातच अडकून पडले आहेत हे दिसून येईल. तोही असा भारत, जो आता खरेतर कुठेच अस्तित्वात नाही, म्हणजे ज्या वर्षी आपण देश सोडला तेव्हाचे भाव, लोकांचे स्वभाव, हेतू आणि नातेसंबंध, सगळेच गोठून जावे असेच मनातून वाटत असते आपल्याला, आपण प्रत्येक भारत-भेटीत होणारा भ्रमनिरास झटकून पुन्हा पुन्हा स्वतःला समजावत राहतो, की भारतात तसेच सगळे रम्य आहे. कुठेतरी ती नाळ आपण जोडून ठेवण्याचा असफल प्रयत्न करत राहतो. मुलं, विशेषतः आपली इथे असलेली मुलं मात्र अतिशय हुशार असतात, त्यांना त्या आपल्या देखाव्यातले खरे खोटे लागलीच दिसते! आपण एका भ्रामक जगात अडकलो आहोत, ह्या निकषांपर्यंत पोचताच ही मुलं, इथलं वास्तव वेगाने स्वीकारतात, कारण हे त्यांचे वर्तमान आहे, आणि जर त्यांना इथं यशस्वी भविष्य घडवायचे असेल तर इथले भान लवकर आलेले बरे, ह्या विश्वासाने ही पोरं बदलू लागतात.

मात्र त्यांच्यापाशीदेखील एक मोठी पोकळी राहून जाते, अर्धवट उमजलेल्या एका संस्कृतीची, अर्धवट उमललेल्या अस्तित्वाची, त्यांचे "कोहम्?"चे उत्तर एकाअर्थाने अपूर्णच!

काय केले म्हणजे हे बदलेल? असा विचार जो जो करू लागले, तो तो समजू लागलं की काही बदल करणे अपेक्षित आहेत, स्वतःमध्ये आणि सभोवताली जो समभाषिक, समप्रादेशिक समाज जोडला आहे, त्यात! स्वतःची संस्कृती, त्यातील रीती ह्यांना त्यांच्या मखरातून थोडे बाहेर काढून, विवेकाचे पाणी लावून लख्ख घासून काढावे लागणार आहे! केले तसेच! मग दिसू लागलं की संपूर्ण सांस्कृतिक संदर्भच नव्याने निर्माण करावे लागणार आहेत. पुन्हा नव्याने इथल्या अमेरिकन मराठी संस्कृतीचा विचार आणि कल्पना करावी लागणार आहे. मागील पानावरुन पुढे अनेक गोष्टी येऊ शकणार नाहीत. मात्र ज्या येऊ शकणार नाहीत, तिथे नुसत्या अक्षता वाहून चालणार नाही, तर नवे संदर्भ घालावे लागणार आहेत. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे हे संदर्भ इथल्या जमिनीतले, इथल्या संस्कृतीतले असायला हवे! कारण ह्याचमुळे ही नवी अमेरिकन मराठी संस्कृती इथे बीजरूपातून बहरून तग धरणार आहे.

मग ह्या नव्याच जाणिवेवर, सगळे भारतीय-मराठी सणवार, रीतीरिवाज, सांस्कृतिक घटना ह्यांना तोलून बघितले. बदलण्यासारखे पुष्कळ होते, आहेच! उदाहरण म्हणून बघू या, महाराष्ट्रात व्याख्यानमाला ह्या मराठी समाजाला नवीन नाहीत, जवळ जवळ १५० वर्षांचा दमदार इतिहास असलेली ही सांस्कृतिक चळवळ, नवीन विचारांना समोर आणणारी, नव्या विचारांना नवे संदर्भ देणारी! ती कधी आणि कशी राहून गेली भारतात, महाराष्ट्रातच? कारण सोबत आणलेल्या बॅगेतून आपण तिचे संदर्भ पुरेसे आणलेच नव्हते! मग इथे अटलांटा मराठी मंडळात प्रयोगशाळाच आरंभली! पँडेमिक म्हणजे एक उत्तम संधीच चालून आलेली! सगळे जग बंदिस्त, भारतात न जाऊ शकणारे आपण सगळेच, मनापासून हळहळत, इथेच जीव रमवत राहिलेले. अशाच सगळ्यांसाठी इथे अटलांटात वसंत व्याख्यानमाला करायचा बेत आखला!

महाराष्ट्रात वसंत संपायच्या आत म्हणजे अवघ्या १०-१२ दिवसात हा उपक्रम करायचे ठरवले! तशी आखणी केली आणि ठरवलं, पहिल्याच वर्षी, व्याख्याते इथलीच मंडळी असतील, ते आपले देशांताराचे अनुभव, नव्या देशातले अनेकविध अनुभव मांडतील, त्यातून अनेकांना स्वतःची नवी गोष्ट सापडेल, काहींना इथे येऊन, बदल स्वीकारणाचे बळ मिळेल आणि जे आता इथेच रुजले आहेत, त्यांना आश्वस्त करणारे नवे मैत्र मिळेल. वक्ते ठरू लागले, तीन पुरुष आणि तीन स्त्रिया!

इथे येऊन किमान १५ ते २० वर्षे झालेली ही मंडळी! प्रत्येकाने निराळीच कहाणी सांगितली, निराळेच विश्व उभारले, निराळीच अनुभव-मालिका उलगडून दाखवली. प्रत्येकाचे अवघे असणे लकाकून निघाले, उजळून निघाले. मनातले दबक्या आवाजातले प्रश्न, भीती, अनेक शंका ह्यांना न मागता उत्तरं मिळत गेली, अनेकांना नवीन दिशा मिळाली, काही नाही तर इथल्या मराठी मंडळाला एक नवीन कोरा कार्यक्रम मिळाला!

अशा व्याख्यानमाला इथल्या प्रत्येक मंडळात होऊ शकतील, प्रत्येक गावातल्या, शहरातल्या जुन्या जाणत्या आणि धाडसी मंडळींनी स्वतःचे अनुभवाचे पेटारे सर्वांसाठी खुले करून द्यायला हवेत. इथे येऊन कष्टाने घेतलेले शिक्षण, पहिली नोकरी, नवा संसार, पोरं आणि इथले पालकत्व! नवराबायकोचे नाते, इथली घरं, इथली घरगुती हिंसा, इथली असहाय्यता, इथली भीती! आपले करीअर, मुलांचे भवितव्य, आर्थिक गुंतवणूक आणि एक ना अनेक पेच! असंख्य अडचणी, ह्या लोकांनी अनुभवलया असणार, वर्णभेद, त्या पलीकडली अमेरिकन माणसांशी मैत्री, इथले सोयरे, इथला निसर्ग, अशा अनेक गोष्टींच्या तंतूंनी इथले आपले वस्त्र अधिक जरतारी जर करता आले तर काय बहार येईल ना!

ह्या सगळ्यातून अटलांटात पहिली वसंत व्याख्यानमाला सादर झाली. विषय भन्नाट होते, एक विषय होता-

घरातले कलह आणि हिंसा, दुसरा होता अमेरिकेत जाणीवपूर्वक केलेले वृक्षारोपण आणि आगळा वेगळा विषय होता एकट्याने केलेले इथल्या डोंगरवाटांवरले प्रवास, सह्याद्रीच्या आठवणी आणि बरेच काही! मुलं, संसार, सगळे सांभाळून चाळीशीनंतर घेतलेले वैद्यकीय शिक्षण, किंवा नवऱ्याच्या पश्च्यात इथे दोन मुलींना मोठं करत केलेला एकटीचा संसार, इथे फिरतीची नोकरी असलेल्या नवऱ्याची दिलेली साथ आणि स्वतःचा उभारलेला व्यवसाय! इतके वैविध्य आम्हाला पहिल्याच खेपेस लाभले, आम्ही घरबसल्या अनुभव-समृद्ध झालो! आणि एक नवीन दिशा उजळू लागली.

आपल्या संस्कृतीची ही नवीन ओळख घडू लागली! ही इथली संस्कृती आहे, इथे सफरचंदाचा गर वापरून फक्कड पन्हं करतात, इथे कडधान्यांना मोड ओव्हनमध्ये आणतात. असे, एक ना, अनेक संदर्भ, जे फक्त अमेरिकन मराठी आहेत! खास इथल्या मातीतले आहेत.

मग आता जी रुजवायला हवी, जगवायला हवी ती अमेरिकन मराठी संस्कृती! नवीन कोऱ्या संदर्भासहित, नवीन कोऱ्या रिवाजासहित आणि नवीनच उमेदीने! ह्यात आपल्या पुढल्या पिढीला संदर्भ मिळतील, इथल्या त्यांच्या जगण्यातले, मागल्या पिढीचा संघर्ष समजून येऊ लागेल आणि ह्या सगळ्या उंच पताका बांधण्यासाठी जो भरभक्कम पाया आहे, तो असू देऊया भारतीय मराठी शिकवणीचा, संस्कारांचा आणि संदर्भांचा. मात्र आता नव्याने अमेरिकन मराठी संस्कृती घडवण्याची वेळ आली आहे, हे मान्य करूया आणि त्या दिशेने अनेक पावलं टाकत राहूया!

***

# दोन किनारे जुळविताना

**- हेमा शेंडे** ( सान्ता रोजा, कॅलिफोर्निया )



पश्चिम किनाऱ्याचे बोट सोडून आम्ही पूर्व - किनाऱ्याचा आसरा घेतला, तेव्हा सकाळ उजाडली होती. आम्ही बॉस्टनहून आमच्या मुलाच्या गांवी जाणाऱ्या आगगाडीत बसलो. दुतर्फा हिरवी सृष्टी पसरली होती आणि डोळ्यांना निववत होती. झाडे- मुख्यतः मेपल, ओक, पाईन, सुमॅक व अजून काही प्रकारची होती. अधूनमधून जांभळट तांबड्या रंगाचा मेपल विरोधाभास दाखवून हिरवाई खुलवत होता. हिरवी झाडे व हिरवेगार गवत यामुळे सर्व दृश्याला एकसंधपणा आला होता. ह्या एकसंधपणात कोठेही अटकाव नव्हता; असलाच तर तो जलाशयांचा होता. अधूनमधून दिसत असलेले झरे, नद्या, डबकी तुडुंब भरलेली होती. सर्व वातावरणावर एक प्रकारचे तृप्तीचे, समाधानाचे आवरण होते. हे सर्व दृश्य मी मंत्रमुग्ध होऊन बघत राहिले. माझी ही उत्कटता कांही नवीन नव्हती. पूर्व किनाऱ्याच्या, ह्या मोसमात केलेल्या भेटीत, माझी ही उत्कटता कायम होती. ह्या सर्व हिरवेपणामागचा जादूगार होता- "पाणी", हे माझ्या मनाला कळत होते.

मुलाच्या घरी, घराभोवतालचे गवत बांधकामामुळे सलग राहिले नव्हते, ते सर्व गवताचे बी पेरून एकसारखे करण्याचा घाट घातला होता. गवतावर बी उडून जाऊ न देण्यासाठीं straw (पेंढा) पसरले होते आणि त्यावर सकाळ-संध्याकाळ पाण्याचा मारा चालू होता. कांहीं ठिकाणी, जेथे-जेथे सूर्यप्रकाश होता, तेथे-तेथे "हिरवे हिरवे गार गालिचे, हरिततृणांच्या मखमालीचे" तयार झाले होते. जेथे बी अजून, उगवले नव्हते, त्यावर रिमझिम पावसासारखा सकाळ- संध्याकाळ वर्षाव चालू होता. त्याखेरीज अधूनमधून हलकासा, वत्सल पाऊस साथ देत होता. माझें मन नकळतच आमच्या कॅलिफोर्नियातल्या सोनोमा काऊंटीच्या पाण्याच्या स्थितीशी तुलना करत होते.

डोंगराळ सोनोमा काऊंटी हिरव्या झाडांनी सुशोभित आहे, पण गवत मात्र खूप वाढून, वाळून सोनेरी झालं आहे. म्हणूनच यांस गोल्डन कॅलिफोर्निया म्हणतात. डिसेंबर- जानेवारीमध्ये येथेही हिरवे डोंगर व गवत असते, पण ते एक- दोन महिन्यांपुरतेच, नंतर पिवळी कुरणे व पिवळे डोंगर! सध्या सोनोमा काऊंटी हा नॉर्थ बे एरिया अवर्षणाचा म्हणून दुष्काळी असा जाहीर झाला आहे. ऑक्टोबर २०१९ ते सप्टेंबर २०२० ह्या काळांत १९.३५ इंच पाऊस झाला. साधारणतः ह्या ठिकाणी ३०.२५ इंच पाऊस होतो. जवळच्या 'सिएरा माऊंटन'मध्ये हिमवर्षाव होतो. तेथे किती बर्फ साठलं आहे, ह्याची हिवाळ्यात मोजणी होते. हे बर्फ वितळून त्याचे पाणी शेतकरी व रहिवासी यांना वापरता येते. ह्यावर्षी नेहमीच्या मानाने फक्त ६ टक्के बर्फाचे आवरण आहे. तेथेही नन्नाचा पाढा!

सोनोमा काऊंटीच्या ६००,००० रहिवासींना, (ज्यांत आमचे सांता रोसा गाव येते) येथले 'सोनोमा लेक', 'मेन्डोसिनो लेक' व 'रशियन रिव्हर' पाण्याचा पुरवठा करते. ह्यांत नुसत्या घरगुती नव्हे, तर सर्व प्रकारच्या गरजा येतात. मेन्डोसिनो लेक सोनोमा लेकच्या मानाने लहान आहे. ह्या वर्षी सोनोमा लेक मध्ये ५५.५% पाणी आहे. 'मेन्डोसिनो लेक' मध्ये ३२.२% इतकेच पाणी आहे. (सध्याची सरासरी जलक्षमतेनुसार पाण्याची पातळी -लेक सोनोमा-५२.२ % आणि लेक मेन्डोसिनो- ३४.९%) आमच्या ओकमॉन्ट ह्या वसाहतीत जवळपासच्या डोंगरातून पाणी घेऊन येणारे ओढे आहेत, ते ह्या वर्षी कोरडे आहेत. आत्ता कुठे वसंत संपून उन्हाळ्याला सुरुवात होते आहे.

ह्या तलावांमधले पाणी उष्णतेने व सूर्यप्रकाशाने बाष्पीभवन होऊन जवळजवळ १००० एकर फूट वायां जाते. त्याखेरीज तळाशी सांठलेलं रेती व गाळ ह्यामुळे पाणी नक्की किती आहे, ह्याचा अंदाज येत नाही.

सोनोमा काऊंटी व आसपासचा भाग शेतकीचा आहे. शेतकरी गुरे, मेंढ्या, कोंबड्या बाळगून असतात. आत्ताच त्यांची गुरे कशी पोसली जाणार, अशी विवंचना चालूं आहे. पुष्कळांनी गुरे विकायला सुरुवात केली आहे. त्याखेरीज द्राक्षांच्या बागा व फळबागा ह्यातही पाण्याच्या तुटवड्याची काळजी लागून राहिली आहे. घरांच्या समोरील हिरवळीला पाणी घालू नका, किंवा हिरवळ नष्ट करा, असा आदेश देण्यात आला आहे.

आमच्या वसाहतीत फिरताना ह्या आदेशाची प्रचिती येते.

घरांत आमच्या नातीची सर्वांत आवडती गोष्ट म्हणजे, आजी-आजोबांचे 'ईस्टकोस्ट'ला कायमचे रहायला येण्याबद्दल चर्चा! हा विचार आमच्याही मनांत आणि आपापसातल्या संभाषणात आला आहे. पण ईस्ट्कोस्टला हिंवाळा पाच-सहा महिन्याचा आणि पुष्कळ बर्फवृष्टीचा! म्हणजे ५/६ महिने आमचे बाहेर जाणे बंद! त्यावर आमच्या नातीचे उत्तर तयार, "आम्ही येऊन तुमचा 'ड्राइव्ह-वे' करू साफ." परंतु एवढे दिवस बाहेर न जाणे आणि न चालणे ह्या गोष्टी आम्हांला मानवणाऱ्या नाहीत; त्यामुळे आम्हांला दुसऱ्या पर्यायाची "आगीची" तयारी ठेवली पाहिजे.

इ.स. २०१७ पासून तीन वेळां आम्हांला दरवर्षी पानगळीच्या मोसमांत आमचे सान्ता रोजाचे घर सोडून आमच्या नातेवाईकांकडे राहायची सोय करावी लागली होती. पहिल्या वर्षी या भागात आमच्या मुलीचे घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. दुसऱ्या वर्षी नुसतीच विवंचना करावी लागली. तिसऱ्या वेळी आग पुष्कळ जवळ येऊन गेली. आमच्या वसाहतीतली चार घरे भस्मसात झाली. आता ह्या वर्षी आगीचा मोसम मे महिन्यापासूनच सुरू झाला. मे महिन्यामध्ये ९९-१०० फॅरन्हाईट तापमान झाले. ह्या वाढलेल्या उष्णतेमुळे आगीची शक्यता तारांच्या किंवा वाळलेल्या गवताच्या घर्षणाने कधी सुरू होईल, सांगता येत नाहीं. मग सुरू होतो अग्निदेव आणि पवनदेव ह्यांच्या एकजुटीशी बिचाऱ्या मानवाचा सामना, मानवाने कितीही बंब जमवले आणि कितीही टीम्स गोळा केल्या तरी त्यांना आगीवर मात करायला वेळ लागतो व काहीतरी, घरे, इमारती, माणसे बळी द्यावे लागतात. कॅलिफोर्नियामधले हवामान वरचेवर बदलत असते. कधी अतिवर्षाव, कधी अवर्षण! गेल्या वीस वर्षात जगाच्या हवामानांत पुष्कळ बदल झाला आहे. त्यामुळे कॅलिफोर्नियातले हवामान अधिक चंचल होईल, असे हवामान-तज्ञांचे म्हणणे आहे.

सध्या आमच्या वसाहतीत आगप्रतिबंधक योजना अंमलात आणत आहेत. उदाहरणार्थ आगीत सहज जळणारी जुनिपर, सायप्रेस्स, रोसमारी ह्यांसारखी झाडे काढून टाकणे; घराच्या व्हेंट्स (vents) मधून आगीचे तंतू (निखारे/embers) येऊं नयेत म्हणून त्यांची जाळी बारीक ठेवणे! सांता रोसा गावाने आगप्रतिबंधक दलात अधिक लोकांची भरती केली आहे; 'पॅसिफिक गॅस अँड इलेक्ट्रिक'ने डोंगरावर व जेथून आग लागण्याची शक्यता आहे अशा ठिकाणी कॅमेरे लावलेले आहेत. आग-प्रतिबंधक दलात नवीन वेगवान व जास्त आग विझवणारे द्रव्य नेऊ शकणाऱ्या हेलिकॉप्टरची नेमणूक झाली आहे.

अशी वैयक्तिक व सामूहिक पातळींवर जोरांत तयारी झाली असली, तरी शेवटी,
"दैव जाणिले कुणी" ही गोष्ट खरी!

***

# उत्तररंग

**एकमेकांचे धरुनी हात | सुखशान्तीची शोधू वाट ||**
**चला राहू आनंदात | आयुष्याच्या उत्तररंगात ||**

बृ . म. मंडळाच्या "उत्तररंग" प्रकल्पांच्या माहितीसाठी संपर्क:
**संदीप दीक्षित** बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य, उत्तररंग नेतृत्व
**फोन क्र.** 1-216-926-6696 **ईमेल** sandeep.dixit@bmmonline.org
**विद्या जोशी** - अध्यक्षा, बृ. म. मंडळ
**फोन क्र.** 1-224-321-2948 ईमेल Vidya.Joshi@bmmonline.org

..........................................................................

**Session # 60 - Topic: "Strength Training"**
**Report by Yogendra Wagh ( San Jose California)**



**Speaker - Pradeep Fulay**

Pradeep Fulay is an engineer by profession. But, he is also certified by the American Council for Exercise and has been helping the community for 20+ years. He is an active athlete. He has participated in half and full marathons.

During this session, Dr. Pradeep discussed on various aspects as below.



**Nutrition:** Importance of choosing the right food and focusing on mindful eating.

**Physical Exercises/Physical Activities:**
Dedicating time for physical movement (gardening, walking, or hiking) that you enjoy to help you stay physically fit, improve daily life, and reduce the risk of chronic diseases.

**Postures and alignment:** A stronger core can help maintain better posture, reduce chances of back-pain, tensions and headaches.

**Other topics:** hese include correct breathing methods, stress management, importance of having adequate sleep, meditation, exercise, sleep and stress management. Dr. Fulay demonstrated a few simple at-home exercises that showcased that you don't need to go to the gym.

To summarize this whole session in a few words, a proper control on your nutrition and regular daily physical exercises (30 – 45 minutes) result in stronger muscles, stronger bones, less risk for chronic diseases, improved metabolism, and a strong and happy healthy mind.

***

# चक्रव्यूह

**-रोहित काळे**
(ग्रीनव्हिल, साऊथ कॅरोलायना)



कोणे एके काळी,
होता गरीब कुणी,
जावुनी राजासमोरी
करी एक विनवणी

राजा विचारी सांग,
काय तुझी मागणी?
कसायला हवी जमीन,
द्याल का हो तुम्ही?

सूर्योदयानंतर धावशील तेव्हढी,
एका अटीवर दान
परतावे लागेल सूर्यास्ताला,
याचे ठेवावे ध्यान

बेभान तो सुटला धावत,
हरपून भूक तहान
सूर्यास्ताची झाली वेळ,
राहिले नाही भान

वेळ झाली परतण्याची,
देही उरले ना त्राण
हव्यासापोटी पळता पळता,
सुटून गेले प्राण

आता तरी तू फिर मागे,
हाव जावूदे गळून
आपल्यातल्या त्या गरीबाकडे
एकदा पहा वळून

हव्यास नको, नको लोभ,
येऊदे जरा कळून
धावण्यात सुटलेले मागे,
क्षण आण जुळून

सूर्यास्ताला आयुष्याची,
वाकून जाईल कमान
संपशील चक्रव्यूहात मग,
त्या अभिमन्यूसमान... !

***

# जेथे असते निर्भय मन ...

**- विनता कुलकर्णी** (शिकागो)

नोबेल पुरस्काराने सन्मानित रवींद्रनाथ टागोर [इ.स. १८६१-१९४१] हे एक नामांकित भारतीय साहित्यिक, शिक्षक, तत्कालीन आधुनिक विचारसरणीचे आणि वसाहतवादासंबंधी टीकाकार. त्यांनी अनेक कविता, कथा, कादंबऱ्या, लेख, नाटके आणि गीते लिहिली. २०व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात, ब्रिटिश राजवटीतून भारत देश मुक्त करण्यासाठी भारतीयांचा संघर्ष चालू असताना **रवींद्रनाथ टागोर** यांनी "Where the mind is without fear" ही कविता ( प्रथम बंगाली भाषेत आणि नंतर इंग्रजीत ) लिहिली.

**Where the Mind is Without Fear...**

Where the mind is without fear and the head is held high;
Where knowledge is free;
Where the world has not been broken up into fragments,
by narrow domestic walls;
Where words come out from the depth of truth;
Where tireless striving stretches its arms towards perfection;
Where the clear stream of reason has not lost its way,
into the dreary desert sand of dead habit;
Where the mind is led forward by thee,
into ever-widening thought and action;
Into that heaven of freedom, my Father, let my country awake.

रवींद्रनाथ टागोरांनी ही संपूर्ण काव्यरचना एकाच मोठ्या वाक्यात, मुक्तछंदात, सोप्या शब्दांत आणि काही रूपक वापरून लिहिली आहे. कवितेत सुरुवातीला, ब्रिटिश राजवटीत इंग्रजांचे वर्चस्व असलेल्या भारतीय लोकांच्या आयुष्यातील दयनीय जीवनाबद्दल कवी लिहितो. देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी लोकांचे विचार भीतीपासून मुक्त झाले, तरच ते सन्मानाने जगू लागतील त्यासाठी त्यांना वैचारिक स्वातंत्र्य, ज्ञानाची दारे खुली असायला हवीत. देशातील प्रांतीय, जातीय भेदभाव, अंधश्रध्दा, आपापसातील वैमनस्य, इत्यादी *("Narrow Domestic walls")* सामाजिक भिंती नष्ट व्हायला हव्यात. देशबांधवांनी सचोटीने जीवन जगायला हवे, अतार्किक रूढींचा त्याग करून, प्रगल्भ विचार आणि कृतीतून पुढे जायला हवे. अशा ठोस, प्रामाणिक प्रयत्नांतून, देश परिपूर्ण स्वातंत्र्याच्या उद्दिष्टाप्रत पोहोचेल, असे कवीस सुचवायचे आहे. कवितेत एक स्वर्गीय ठिकाण म्हणून स्वातंत्र्य संदर्भित केले आहे आणि परमेश्वराला पिता म्हणून संबोधिले आहे. लोकांना जागृत करण्यासाठी आणि स्वर्गतुल्य स्वातंत्र्याच्या गौरवशाली ठिकाणीं पोहोचण्यास मार्गदर्शन करण्यासाठी कवी या कवितेतून जगत्पिता- ईश्वराकडे प्रार्थना करत आहे. आजदेखील ही कविता कालबाह्य वाटत नाही. या इंग्रजी कवितेचा मराठी भावानुवाद करण्याचा येथे प्रयत्न !

**जेथे असते निर्भय मन...**

जेथे असते निर्भय मन, अन् ताठ मान;
जेथे असते बंधनमुक्त ज्ञान;
जेथे नसते जगाची तुकड्यांत विभागणी,
आपापसातील क्षुद्र भेदभावाच्या भिंतींनी;
जेथे असते शब्दांची, सत्याच्या पायावर उभारणी;
जेथे वाहतात अथक प्रयत्नांचे स्रोत,
परिपूर्णतेच्या ध्येयांप्रत;
जेथे तर्कशुध्द विचारांचा झरा, नाही सुकून जात,
अंध परंपरांच्या शुष्क वाळवंटात;
जेथे तुझ्या मार्गदर्शनाने घडतो मनाचा विकास,
सदैव उदात्त विचार अन् कृतींतून पुढे जाण्यास;
(अशा) त्या स्वातंत्र्यरूपी स्वर्गीय वातावरणात,
हे पितृतुल्य सर्वेश्वरा, होऊदे माझा देश जागृत !

***

**१५ ऑगस्ट २०२१: भारतदेशाच्या अमृत महोत्सवी ७५व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त शुभेच्छा !**

# Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status.

**An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape.**

**India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive. FSC is the answer.**

**For more detail.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org"**
**Or**
**Email to Admin@SmallCharity.Org**
**You will hear from:**
**Ramesh Sarva, CPA, 183 S. Broadway,#210, Hicksville NY 11801**
**Join Donor List:**

| | |
|---|---|
| SUHASINI JOSHI | COSMIC BEATS |
| KAMALAKAR PENDSE | ATHASHREE |
| KISHOR DANDEKAR | AMPTE FOUNDATION |
| KIRAN NANDINI JOAG | V.T. PATIL FOUNDATION |
| MUKUND SHAILA DIDOLKAR | EDUCATIONAL FOUNDATION |
| SUBHASH SUHASINI PURANIK | CASP, PATHAK TRUST |
| RAHUL PUNAM MUTHA | ANAND RISHI HOSPITAL- AHMADNAGAR MH |
| KASI& GEETHA GABBITA | NIH, INDIA |
| ANDREW LEDERER | BUILDASCHOOLININDIA.COM |
| JAGDISH & SHUBHANGI THAKUR | MADHAV NAGARKAR, SWAROOP YOG |
| KOTESWARA RAO KUNDA MD | GUNTUR AP EDUCATIONAL FOUNDATION |
| SHREERAM RATNA AGHARKAR | AID DISABLED CHILDREN & WOMEN'S EDU |

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
3574 S. Marion Way
Chandler, AZ 85286



नाते जुळते मनाशी मनाचे




Reshimgathee

A BMM Matrimonial Initiative for
Maharashtrians in North America

https://reshimgathee.bmmonline.org/

**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

*** VISITORS**
*** H-1 B VISA HOLDERS**
*** PERMANENT RESIDENTS**
**( Some restrictions apply)**

**For more information:**

**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**

**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: **888 705 8271**

E-mail: padmaja.p.bapat@gmail.com

Website: **visitors-insurance.com**